939

जाक्र.सिंजिप/आवि/जिप्रप/खाद्यपदार्थ/ /२०२६
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी, दिनांक 16/06/2026

# दरपत्रक सुची

जिल्हा प्रशिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग मार्फत आयोजीत प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण करीता वर्ष २०२६-२७ साठी खाद्यपदार्थ पुरविणेसाठी खालील शर्तीना अनुसरुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सोबत दिलेल्या नमुन्यात वैद्यकिय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग यांचे नावे सिलबंध लखोटयात प्रत्यक्ष किंवा टपालाव्दारे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, ता. कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग या पत्त्यावर दिनांक 23/06/2026 रोजी सायं. 5:00 p.m वाजेपर्यंत पाठवावी.

दरपत्रकासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

1) GST क्रमांक झेरॉक्स प्रत, GST क्रमांक लागू नसल्यास व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र,
2) अन्न व औषध प्रशासनाचा दाखला
3) पॅनकार्ड झेरॉक्स प्रत द्यावी (बचत गट असल्यास बचत गटाच्या नावाने पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.)

अटी व शर्ती-

१) दरपत्रकामधील दर सर्व करांसहीत नमूद करावेत. **तसेच नमुद केलेले दर प्रति नग असावेत मंजूर दर पुरवठा आदेश प्राप्त झालेपासून पुढील एक वर्षासाठी बंधनकारक असतील.**

२) दरपत्रके शक्यतो वरनमुद दिनांकास आरोग्य विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. सिंधुदुर्ग यांचे कार्यालयात उघडणेत येतील.

३) प्रशिक्षण आयोजीत केलेल्या ठिकाणी जेवण चहा नाष्टा पुरवठा करणेचा आहे.

४) प्रशिक्षणासाठी सर्वसाधारणपणे सकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत नाष्टा व चहा, त्यानंतर दुपारी १.०० ते २.०० या वेळेत जेवण व रात्री ८.३० ते ९.३० या वेळेत जेवण अशी खाद्यपदार्थ पुरवठा करण्याची वेळ राहील. वरील वेळेत बदल होऊ शकतो. वेळेत झालेल्या बदलाची आगावू कल्पना दिली जाईल. त्यानुसार दिलेल्या वेळेत खाद्यपदार्थ पुरवठा करणेचा आहे.

५) प्रत्येक प्रशिक्षणाच्या पूर्वी १ किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार पदार्थ पुरवावयाचे आहेत.

६) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण **/ नाष्टयानंतरची त्याठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.**

७) प्रशिक्षक अथवा प्रशिक्षणार्थी यांचा उपवास असल्यास अल्पोपहार / जेवण वेळेत उपवासाचे पदार्थ **उदा.साबू खिचडी-दही किंवा साबूदाणा वडा, वेफर्स ,केळी किंवा सफरचंद द्यावे लागेल**

८) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत. **गरम अन्नपदार्थ वाढणेसाठी प्लास्टीकचा वापर करु नये**

९) कोणतेही एक किवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे.

१०) उपस्थिती पत्रकाच्या नोंदीवरुन जेवण/चहा/नाष्टाचे देयक पी.एफ.एम.एस.व्दारे अथवा एन.ई.एफ.टी व्दारे आदा केले जाईल. देयकासोबत पासबुक अथवा क्रॉस चेक देणेचे आहे.

११) ठरवून दिलेल्या वेळेत खाद्य पदार्थ दिले पाहीजेत. निवासी प्रशिक्षणामध्ये रात्रीच्या जेवणाचा समावेश असेल.

१२) पुरवठादाराने दरपत्रक देतेवेळी कोणतीही अट घालावयाची नाही.

१३) ज्या पुरवठादारास मक्ता मंजूर आहे त्या मक्तेदाराने वर नमुद अटी व शर्तीचे पालन न केल्यास कोणतीही सुचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल व क्रमांक दोनच्या दरपत्रक धारकास संधी दिली जाईल.

१४) दरपत्रक नामंजूर झाल्यास त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५) मंजूर दरपत्रक धारकास वरील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करुन द्यावा लागेल

18/05/26

वैद्यकिय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग

(डॉ.सई धूरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

**जिल्हा प्रशिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, सिंधुदुर्ग अंतर्गत वर्ष २०२६.२७ मध्ये आयोजीत प्रशिक्षणासाठी दरपत्रकाचा नमुना**

| अ.क्र. | पदार्थाचे नाव | वर्णन / प्रमाण | अंदाजीत मागणी नगसंख्या | दर प्रति नग रु. |
|---|---|---|---|---|
| १ | चहा साधा | ७५ मिली. | 2086 | |
| २ | **अल्पोपहार**<br>शिरा गोड/उपिट/कांदा पोहे /समोसा/वडा पाव | १५० ते २०० ग्रॅम | 1806 | |
| ३ | **अल्पोपहार**<br>साबू खिचडी /इडली चटणी/इडली सांभार/आंबोळी चटणी /मिसळ /मेंदू वडा | १५० ते २०० ग्रॅम | 280 | |
| ४ | पुरी भाजी | ७ पुरी बटाटा भाजी | 200 | |
| ५ | शाकाहारी जेवण साधे (मर्यादीत) | २ चपात्या, तीन मुद भात, प्रत्येकी २ वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, | 1866 | |
| ६ | शाकाहारी जेवण साधे (अमर्यादीत) | चपात्या, भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी इत्यादी खाईल तेवढे | 168 | |
| ७ | शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादीत) | चपात्या / पु-या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी खाईल तेवढे | 26 | |
| ८ | चिकन जेवण (अमर्यादीत) | चपात्या, भात, सुके चिकन, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी खाईल तेवढे | 26 | |

वैद्यकिय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सिंधुदुर्ग

18/05/26
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग